Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind
Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर
रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Fax : 25665807 | Secretary(P) : 25651750

महत्वाचे

जा. क्र.रा.मं./परीक्षा-७/६८७९
पुणे ४११ ००४.
दिनांक -२८/१२/२०१८
२९

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

**विषय** :- शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या तसेच लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना इ.१०वी साठी सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत..

**संदर्भ** :- १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एसडी-२ दि.२४/११/२०१७

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण -२०१८/प्र.क्र.३९२/ एसडी-२ दि.१९ डिसेंबर, २०१८

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, शासनाने शास्त्रीय कला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती संदर्भिय दि.२४/११/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केलेली आहे. त्यानुसार शास्त्रीय नृत्य, गायन व वादन या कलाप्रकारात त्या विद्यार्थ्याने मान्यताप्राप्त संस्थेच्या सलग ३ परीक्षा अथवा ५ परीक्षा दिल्या असेल त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कलेमध्ये मिळालेले गुण व त्यानुसार मिळणारी ग्रेड यानुसार सवलतीचे अतिरिक्त गुण दिले जातात.

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या ज्या विद्यार्थ्यांची 'प्रारंभिक'(पहिली) परीक्षेची तयारी होते त्यांना सरळ 'प्रवेशिका प्रथम'(दुसरी) परीक्षेमध्ये बसण्यास परवानगी दिली जाते. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुणांसाठी, तीन परीक्षा सलग उत्तीर्ण असण्याची अट पूर्ण करता येत नाहीत. त्यामुळे असे विद्यार्थी सध्याच्या नियमाप्रमाणे वाढीव गुणांसाठी पात्र ठरत नाहीत. या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये याकरिता अशा विद्यार्थ्यांसाठी सलग तीन परीक्षांची अट शिथिल करण्यात यावी अशी विनंती अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडल यांनी शासनास केली होती.

त्यास अनुसरून शासनाने संदर्भिय क्र. २ च्या पत्रान्वये याप्रकरणी संबंधित विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये याकरिता अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडल मध्ये ज्या जुन्या विद्यार्थ्यांनी थेट दुसऱ्या वर्षाला प्रवेश घेतला आहे, त्यांचेबाबतीत सलग तीन परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट शिथिल करण्याचे निर्देश दिलेले आहे. तरी विभागीय मंडळ स्तरावर यानसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४.

---

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर -४१६ ००४.**

क्र.कोविमं/शाखा माध्य परीक्षा/कला सवलत/ 2695
कोल्हापूर ४१६००४.
दिनांक:-०८/०१/२०१९

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुख
सातारा, सांगली व कोल्हापूर.

शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) मार्च-१९ परीक्षेमध्ये सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबातच्या कार्यपध्दतीबाबत राज्य मंडळाचे जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/६८७९ दि.२९/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घेऊन कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.